मंगळवार, दि. १६ डिसेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ११३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका घोषित

# १५ जानेवारी रोजी मतदान १६ ला मतमोजणी

**मुंबई -** ठाण्यासह राज्यातील प्रलंबित २९ महापालिकांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. या महापालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून त्याचा निकाल १६ जानेवारी रोजी लागणार आहे. त्यासाठी आजपासून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेऊन ही घोषणा केली. राज्यातील २९ महापालिकांसाठी ३ कोटी ४८ लाख मतदार मतदान करणार आहेत.

ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका या गेल्या पाच ते सात वर्षांपासून किंवा त्या पेक्षा जास्त कालावधीपासून प्रलंबित होत्या. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला. त्यामध्ये सुरुवातीला २ डिसेंबर रोजी नगरपालिका आणि नगरपरिषदांच्या निवडणुका घेण्यात आल्या. आता त्यानंतर राज्यातील प्रलंबित २९ महापालिकांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला.

**महापालिकेच्या निवडणुकीचे वेळापत्रक**

नामनिर्देशन पत्र स्वीकारणे - २३ डिसेंबर ते ३० डिसेंबर, अर्जाची छाननी - ३१ डिसेंबर, उमेदवारी माघारीची मुदत - २ जानेवारी, चिन्ह वाटप आणि अंतिम उमेदवार यादी - ३ जानेवारी, मतदान - १५ जानेवारी, निकाल - १६ जानेवारी,

राज्यातील २७ महापालिकांची मुदत संपली आहे. त्यासोबत जालना आणि इचलकरंजी या दोन नवीन महापालिकांच्या निवडणुका होणार आहेत. या महापालिका निवडणुकांसाठी १ जुलै २०२५ रोजीची मतदान यादी ग्राह्य धरण्यात येणार आहे. ही यादी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून आली असल्याने त्यामध्ये नावे वगळण्याचे अधिकार राज्य आयोगाला नाहीत असं स्पष्ट करण्यात आलं आहे.

एकूण मतदार - ३.४८ कोटी, एकूण मतदार केंद्र - ३९,१४७, मुंबईसाठी मतदार केंद्र - १०,१११, कंट्रोल यूनिट - ११,३४९, बॅलेट यूनिट - २२,000

**निवडणूक खर्चाची मर्यादा**

महापालिका निवडणुकीसाठी खर्चाची मर्यादा निवडणूक आयोगाने आखून दिली आहे. त्यामध्ये मुंबईसह अ वर्ग महापालिकांसाठी एका उमेदवाराला १५ लाख रुपये खर्च करण्याची मुभा आहे.

अ वर्ग - १५ लाख, ब वर्ग - १३ लाख, क वर्ग - ११ लाख, ड वर्ग - ९ लाख.

मुंबई महापालिकेमध्ये एक सदस्यीय वॉर्ड असल्यामुळे मतदारांना एकच मत द्यावं लागणार आहे. तर उर्वरित २८ महापालिकांसाठी एक ते पाच सदस्यीय वॉर्ड असल्याने त्यानुसार मतदान द्यावं लागणार आहे.

महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज फक्त ऑफलाईन पद्धतीने करता येणार आहे. तसेच ज्या उमेदवारांकडे सध्या जात वैधता प्रमाणपत्र नाही त्यांना निवडणुकीपासून सहा महिन्यांच्या आत सादर करावं लागणार आहे.

मतदार जनजागृतीसाठी रील तयार करण्यात आले आहेत. जेष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठी मतदार केंद्रावर आवश्यक त्या सुविधा असतील. मतदान केंद्रावर रँप आणि व्हील चेअर असतील.

राज्यातील १,९६, ६०५ कर्मचारी या निवडणुकीसाठी काम करतील. मतदानाच्या आधी ४८ तास प्रचारावर बंदी असेल. तसेच त्या दरम्यान जाहिरातींवरही बंदी असेल. महापालिका निवडणूक नियमांनुसार ही बंदी असेल.

राज्यातील २९ महापालिकांसाठी एकूण २,८६९ जागांसाठी मतदान होणार आहे. त्यामध्ये १,४४२ महिला सदस्य, ७५९ इतर मागासवर्गीय सदस्य, ३४१ अनुसूचित जाती तर ७७ सदस्य हे अनुसूचित जमातीचे सदस्य असतील.

**दुबार मतदारांच्या नावासमोर स्टार चिन्ह**

मुंबईत ११ लाख संभाव्य दुबार मतदार आहेत. एकूण मतदारांचा विचार करता ती सात टक्के इतकी असल्याचं समोर आलं आहे. या दुबार मतदारांची ओळख केली असून त्यांच्या नावासमोर दोन स्टार असतील. त्यांच्या घरी जाऊन सर्वेक्षण केलं आहे आणि मतदान कुठे करणार हे त्यांच्याकडून प्रतिज्ञापत्र घेण्यात आले आहे. ज्यांचा सर्व्हे झाला नाही त्यांच्याकडून मतदान केंद्रावर हमीपत्र घेतल जाईल.

**कोणत्या महापालिकांमध्ये निवडणूक होणार?**

बृहन्मुंबई - २२७, भिवंडी-निजामपूर - ९०, नागपूर - १५१, पुणे - १६२, ठाणे - १३१, अहमदनगर - ६८, नाशिक - १२२, पिंपरी-चिंचवड - १२८, औरंगाबाद - ११३, वसई-विरार - ११५, कल्याण-डोंबिवली - १२२, नवी मुंबई - १११, अकोला - ८०, अमरावती - ८७, लातूर - ७०, नांदेड-वाघाळा - ८१, मीरा-भाईंदर - ९६, उल्हासनगर - ७८, चंद्रपूर - ६६, धुळे - ७४, जळगाव - ७५, मालेगाव - ८४, कोल्हापूर - ९२, सांगली-मिरज-कुपवाड - ७८, सोलापूर - ११३, इचलकरंजी - ७६, जालना - ६५, पनवेल - ७८, परभणी - ६५.

# हस्तांतरणविना थाटले जिल्हा नियोजन भवन

## नियम धाब्यावर, जबाबदारी कोणाची..?

**जालना | प्रतिनिधी -** येथील जिल्हा नियोजन भवन अद्याप अधिकृतरीत्या हस्तांतरीत झालेले नसतानाही तेथे जिल्हाधिकारी कार्यालयाचे कामकाज सुरू असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. यासंदर्भात विचारणा केली असता सदर इमारत अद्यापही सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) क्र. १, जालना कार्यकारी अभियंता यांच्या अखत्यारीत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे, जिल्हा नियोजन समिती कार्यालयाकडे आजतागायत या इमारतीचे हस्तांतरणच झालेले नाही. असे असतानाही या इमारतीत जिल्हाधिकारी यांनी आपले बस्तान मांडले असून नियमित प्रशासकीय कामकाज चालवले जात आहे.




**हस्तांतरण म्हणजे काय?**

शासकीय इमारतीच्या बाबतीत पुढील प्रक्रिया अनिवार्य असते, काम पूर्णत्व प्रमाणपत्र (Completion Certificate), स्ट्रक्चरल सेफ्टी सर्टिफिकेट, विद्युत, अग्निशमन, पाणी व स्वच्छता प्रमाणपत्रे, हस्तांतरण पंचनामा (Handover-Takeover Memo), संबंधित विभागाकडे अधिकृत ताबा सुपूर्त करणे, या पैकी कोणतीही प्रक्रिया पूर्ण न झाल्यास ती इमारत वापरात आणणे कायदेशीरदृष्ट्या चुकीचे ठरते. कोणते नियम मोडले गेले? काम पूर्ण होऊन अधिकृत हस्तांतरण होईपर्यंत इमारत वापरात आणणे निषिद्ध असते हा ढोबळ नियम आहे. महाराष्ट्र शासकीय वित्तीय नियम हस्तांतरणाशिवाय वापर केल्यास सार्वजनिक मालमत्तेच्या गैरवापराचा ठपका ठेवता येतो. **आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५,** इमारतीत अपघात, आग, भिंत कोसळणे इ. दुर्घटना झाल्यास जबाबदारी निश्चित न झालेली असल्यास थेट प्रशासकीय प्रमुखावर जबाबदारी येऊ शकते.? भारतीय दंड संहिता / नवीन भारतीय न्याय संहिता नुसार दुर्लक्ष, निष्काळजीपणा किंवा जीवितास धोका निर्माण झाल्यास संबंधित अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल होऊ शकतो.

**अपघात झाल्यास जबाबदार कोण?**

हा सर्वात गंभीर प्रश्न आहे. इमारत पीडब्ल्युडीच्या अखत्यारीत असताना, जिल्हाधिकारी तिथे बसतात कर्मचारी व नागरिकांची ये-जा असते. अशा स्थितीत अपघात झाल्यास जबाबदारी ठरवताना प्रशासन, जिल्हाधिकारी व पीडब्ल्युडी यांच्यात दोषारोपाचा खेळ सुरू होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**प्रशासनावर गंभीर प्रश्नचिन्ह**

हस्तांतरण न झालेली इमारत वापरण्याची परवानगी कोणी दिली? अग्निशमन व संरचनात्मक सुरक्षा तपासणी झाली आहे का? जिल्हा नियोजन समितीने ताबा का स्वीकारलेला नाही? जिल्हाधिकाऱ्यांनी नियमांकडे दुर्लक्ष का केले?

**स्पष्टीकरणाची गरज**

या संपूर्ण प्रकरणात जिल्हाधिकारी यांनी सार्वजनिकपणे स्पष्टीकरण देणे अत्यावश्यक झाले आहे. तसेच, तातडीने हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण करावी, सर्व सुरक्षा प्रमाणपत्रे जाहीर करावीत, अन्यथा इमारतीचा वापर तात्काळ थांबवावा, अशी मागणी आता नागरिक व प्रशासकीय वर्तुळातून होत आहे. शासकीय नियम कागदावर आणि प्रत्यक्षात वेगळे जिल्हा नियोजन भवन प्रकरण प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उभे करणारे ठरत आहे.

## पंतप्रधानपदी नागपुरातील भाजपा नेत्याला संधी मिळणार - पृथ्वीराज चव्हाण

**नागपूर -** काँग्रेस नेते तथा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी गेल्या ८ दिवसांत दोनवेळा केलेल्या राजकीय वक्तव्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. थेट देशाचा पंतप्रधान लवकरच बदलणार असल्याचं त्यांनी म्हटलं होतं. आता, पिंपरी चिंचवड येथील एका कार्यक्रमातही त्यांनी पुनर्उल्लेख केला. देशाच्या पंतप्रधानपदी नागपुरातील भाजपच्या नेत्यांना संधी मिळण्याची शक्यता असल्याचं त्यांनी म्हटलं. विशेष म्हणजे यावेळी त्यांनी १९ तारीखही सांगितल्याने अनेकांना आश्चर्य वाटत आहे. तर, भाजप नेते पृथ्वीराज चव्हाण यांच्या वक्तव्यावर टीका करत आहेत. पृथ्वीराज चव्हाण यांनी प्रदीर्घ काळ पीएमओ कार्यालयात काम केलेले आहे. दिल्लीत त्यांचे अजूनही चांगले संबंध आहेत. त्यामुळे, त्यांचे वक्तव्य अनेकांना गंभीर वाटत आहे. आता, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही यावर प्रतिक्रिया दिली.

मोदी तेरी कबर खुदेगी, अशी घोषणा दिल्लीत काँग्रेसकडून करण्यात आली होती. त्यानंतर, भाजपकडूनही काँग्रेसवर जोरदार पलटवार करण्यात आला. काँग्रेसची विचारसरणी आणि मानसिकतेचं प्रदर्शन यातून होत असल्याचं भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांनी म्हटलं आहे. तर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही काँग्रेसच्या या भूमिकेवर प्रतिक्रिया देत काँग्रेसच्या नेत्यांचं हे वर्तन ही मूर्खपणाची घोषणा असल्याचं फडणवीस यांनी म्हटलं. तसेच, पृथ्वीराज चव्हाण यांनी पंतप्रधान पदाबाबत केलेल्या भविष्यवाणीवरही मुख्यमंत्र्यांनी प्रतिक्रिया दिली. आत्तापर्यंत वेगवेगळ्या नेत्यांना साक्षात्कार होत होते, त्यांना स्वप्न पडत होती हे आम्ही पाहिलेलं आहे. मात्र, पृथ्वीराज चव्हाण यांच्यासारखा ज्येष्ठ नेता, जे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहिले आहेत, पीएमओचे मंत्री राहिले त्यांनाही असे साक्षात्कार व्हायला लागला म्हणजे निश्चितच यात काहीतरी काळबेरं आहे. त्यामुळे, त्यांचं आरोग्य उत्तम राहावं या त्यांना शुभेच्छा आहेत. तसेच, असा विचार करुन त्यांनी स्वतःला फार त्रास करुन घेऊ नये, असा माझा त्यांना सल्ला असल्याचंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

## जालना शहराच्या भविष्यासाठी बुधवारी 'मंथन' परिषदेचे आयोजन

**जालना | प्रतिनिधी -** जालना शहराच्या शाश्वत, स्वच्छ आणि नियोजित विकासासाठी बुधवार दि. १७ डिसेंबर रोजी सकाळी ९.३० ते दुपारी २ या वेळेत हॉटेल सिद्धार्थ द फर्न येथे 'मंथन : व्हेअर आयडियाज बिकम क्शन' या एकदिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद 'व्हिजन जालना २०३०' या संकल्पनेवर आधारित असून शहर विकासाच्या महत्त्वाच्या प्रश्नांवर ठोस उपाययोजनांवर चर्चा केली जाणार आहे.




नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढवणे, घनकचरा व द्रवकचरा व्यवस्थापन अधिक सक्षम करणे आणि सार्वजनिक जागांची देखभाल सुधारण्यावर भर देणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे. जिल्हा प्रशासन, जालना शहर महानगरपालिका आणि जालना फर्स्ट यांच्या संयुक्त पुढाकारातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

दोन सत्रामध्ये पार पडणाऱ्या या परिषदेत सोर्स सेग्रिगेशन, कलेक्शन व सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट सिस्टीम या पहिल्या सत्रात नेत्ररोगतज्ज्ञ तथा डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू एफच्या संस्थापक डॉ. रूबी मखीजा, कार्पल्स कन्सल्टिंगच्या मॅनेजिंग पार्टनर, सौ. श्रुती लटे, सुहासिनी एंटरप्रायझेसचे प्रोप्रायटर विरेंद्र पटेल, आयआयटी दिल्लीचे प्रोफेसर ए. के. गोसाईन, इकोसत्त्वाच्या को-फाउंडर सौ. गौरी मिराशी, एन्व्हर्सिस ग्रीनटेक सोल्युशन्सचे डायरेक्टर अमोल गजरे हे मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. दुसरे सत्र अर्बन ड्रेनेज, एसटीपी व लिक्विड वेस्ट मॅनेजमेंट या विषयावर होणार असून, त्यात मंत्राज ग्रीन रिसोर्सेस लिमिटेडचे चीफ प्रमोटर व चेअरमन डॉ. यू. के. शर्मा हे मार्गदर्शन करणार आहेत.

या परिषदेस वॉटर लिटरसी सेंटरचे (यशदा, पुणे) एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर डॉ. सुमंत पांडे आणि अर्बन प्लॅनर तथा डिझाईनशाला कोलॅबोरेटिव्हचे फाउंडर व प्रिन्सिपल आर्किटेक्ट आशिक जैन यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. तसेच गाइडिंग पिलर्स म्हणून प्रिन्सिपल सेक्रेटरी (यूडीडी-१), असीम के. गुप्ता, छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेचे आयुक्त व प्रशासकीय अधिकारी जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी तथा महानगरपालिकेच्या आयुक्त सौ. आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. मिन्नू पी. एम. यांची उपस्थिती राहणार आहे. ही परिषद सिटिझन्स, एक्स्पर्ट्स आणि डिसिजन मेकर्स यांना एकत्र आणणारे प्रभावी व्यासपीठ ठरणार असून जालना शहराच्या विकासासाठी विचारातून कृतीकडे वाटचाल करण्याचा हा प्रयत्न आहे.युअर व्हॉइस. युअर सिटी. युअर मंथन.या संदेशासह जालना शहरातील नागरिकांनी या परिषदेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## राष्ट्रीय लोकन्यायालयात तडजोडीने १ हजार १०४ प्रकरणे निकाली

**जालना | प्रतिनिधी -** उच्च न्यायालय,महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या निर्देशानुसार आणि न्यायमुर्ती उच्च न्यायालय मुंबई,न्यायमुर्ती उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ,येथील न्यायमुर्ती तथा जालना न्यायीक जिल्ह्याचे पालक न्यायमुर्ती अरूण आर.पेडणेकर ह्यांनी दुरदृश्यप्रणालीव्दारे उपस्थित राहून मार्गदर्शन केले.जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्षा एम.मोहिते यांच्या उपस्थितीत शनिवार दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी जालना जिल्ह्यातील सर्व न्यायालयात लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते.



दिनांक १३ डिसेंबर रोजी पार पडलेल्या लोकन्यायालयामध्ये प्रलंबित व दावा दाखलपुर्व अशी सुमारे ३९ हजार ८२३ प्रकरणे ठेवण्यात आली होती.त्यापैकी १ हजार १०४ प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली आहे. जिल्ह्यामधील न्यायालयात प्रलंबित प्रकरणापैकी एकूण ५ हजार ७०० प्रकरणे लोकन्यायालयासाठी ठेवण्यात आली होती.यात दिवाणी,फौजदारी,मोटार अपघात,भूसंपादन आणि १३८ एन.आय.क्टच्या प्रकारणांचा समावेश होता.त्यापैकी ५४२ प्रकरणे निकाली निघाली आहे.तर दाखलपुर्व ३४ हजार १२३ प्रकरणांपैकी सुमारे ५६२ प्रकरणे निकाली निघाली आहे. अशी एकुण १ हजार १०४ प्रकरणे निकाली काढण्यात आली. लोकन्यालयामध्ये १७ कोटी ४ लाख ७० हजार ५४६ एवढ्या रकमेची प्रकरणे निकाली निघालेली आहे. तसेच कौटुंबिक न्यायालयातील प्रलंबित प्रकरणातील लोकन्यायालयामध्ये ठेवण्यात आलेल्या प्रकरणांपैकी ५ परिवारांचा संसार सुखाचा झाला असून पाचही महिला आपल्या पतीच्या घरी नांदण्याकरिता गेल्या आहेत. यावेळी जिल्हा न्यायाधीश एन.एस. शेख,जिल्हा न्यायाधीश आर.बी. पारवेकर, तदर्थ जिल्हा न्यायाधीश जी.आर.ढेपे, सचिव,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,जालना नितेश एम.बंडगर आणि जालना मुख्यालयातील सर्व न्यायीक अधिकारी, जालना जिल्हा वकील संघ अध्यक्ष अनिरूध्द बी.घुले पाटील,जिल्हा वकील संघाचे सर्व पदाधीकारी,सर्व विधिज्ञ,जिल्हा सरकारी वकील,जिल्हा सरकारी अभियोक्ता यांची उपस्थिती होती. असे प्रभारी सचिव,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जालना,यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

## संपादकीय पान

## विनोदी भुमिका साकारणारा बादशाह

जवळपास दोन अडीच दशके मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा लक्ष्या अर्थात लक्ष्मीकांत बेर्डे याचा आज स्मृतिदिन. लक्ष्या म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीला पडलेले एक विनोदी स्वप्न. लक्ष्या या नावाशिवाय मराठी चित्रपटाचा इतिहास लिहिलाच जाऊ शकत नाही. लक्ष्मीकांत बेर्डे या त्याच्या पडद्यावरील नावापेक्षा लक्ष्या या नावानेच तो अधिक ओळखला जातो कारण हे नाव त्याला प्रेक्षकांनी दिले आहे. लक्ष्या हा मराठी प्रेक्षकांना आपल्यातीलच एक वाटायचा म्हणूनच दहा वर्षाच्या मुलापासून ऐंशी वर्षांच्या आजोबांपर्यंत सर्वांनी लक्ष्यावर अतोनात प्रेम केले. जवळपास दोन अडीच दशके आपल्या सहज - सुंदर, विनोदी अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात घर करणाऱ्या लक्ष्याचा जन्म २६ ऑक्टोबर १९५४ रोजी झाला. लहानपणापासून अभिनयाची आवड असलेल्या लक्ष्याने आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात टुरटुर या नाटकाद्वारे केला. टुरटुर हे त्याचे पहिलेच नाटक कमालीचे हिट झाले आणि या नाटकातील त्याची भूमिकाही प्रेक्षकांना आवडली. त्यानंतर शांतेचं कार्ट चालू आहे, बिघडले स्वर्गाचे दार या नाटकातून त्याने केलेल्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना भावल्या. ही नाटके देखील हिट झाली. लागोपाठच्या नाटकात विनोदी भूमिका करून लक्ष्या नाट्य सृष्टीत आघाडीचा विनोदी अभिनेता म्हणून पुढे येऊ लागला. याच भूमिकांच्या जोरावर त्याला मराठी चित्रपटातही संधी मिळाल्या. अर्थात नाटका प्रमाणे इथेही त्याला विनोदी भूमिकाच मिळाल्या त्यानेही या भूमिकांचे सोने करत त्याला मिळालेल्या विनोदी भूमिकांना न्याय दिला . त्याच्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना खूप आवडल्या. त्याची लोकप्रियता वाढू लागली. लक्ष्या या नावाने आबालवृद्धांमध्ये त्याची लोकप्रियता पसरली. त्याचे चित्रपट प्रचंड यशस्वी झाले. त्याची जोडी जमली ती महेश कोठारे यांच्यासोबत. महेश कोठारेंचा चित्रपट आणि लक्ष्या नाही असे सहसा घडलेच नाही. कारण महेश कोठारे आणि लक्ष्या ही जोडी म्हणजे यशाची खात्री अशी ओळखच बनली. या दोघांचा चित्रपट म्हणजे मनोरंजनाची शंभर टक्के हमी. या दोघांनी एकत्रित भूमिका केलेले धूमधडाका, धडाकेबाज, थरथराट, दे दणादण, झपाटलेला असे कितीतरी चित्रपट तिकीटबारीवर यशस्वी झाले. यशस्वीच नाही तर या चित्रपटांना प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. लक्ष्याने सचिन पिळगावकर यांच्या सोबत केलेला अशी ही बनवा बनवी हा चित्रपट देखील हिट झाला. लक्ष्या आणि अशोक सराफ या दोघांचीही जोडी जमली. या दोघांनी एकत्रित अनेक चित्रपट केले आणि ते यशस्वीही झाले. ८० आणि ९० च्या दशकात लक्ष्या आणि अशोक सराफ या जोडीने मराठी चित्रपट सृष्टीत अक्षरशः धुमाकूळ घातला. ही जोडी म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीतील राम लक्ष्मणाची जोडी. या दोन्ही कलाकारांचे ट्युनिंग अतिशय चांगले जमले होते. या दोघानी मराठी मनांचे मनोरंजन करीत अनेकांना आयुष्यातील तणाव, दुःख विसरायला लावून आनंदाचे कारंजे फुलविले. मराठीत लोकप्रियतेच्या शिखरावर असताना लक्ष्याला हिंदी चित्रपट सृष्टीतून चांगल्या ऑफर येऊ लागल्या. त्यातील काही ऑफर त्याने स्वीकारल्या. राजश्री प्रॉडक्शन्सच्या मैने प्यार किया या चित्रपटात त्याला सलमान खानच्या मित्राची भूमिका मिळाली ती त्याने छान निभावली. याशिवाय अनेक हिंदी चित्रपटात त्याने भूमिका केल्या मात्र त्याच्या अभिनयाचा कस लागेल अशा भूमिका त्याला हिंदीत मिळाल्या नाहीत त्या त्याला मिळाल्या म राठीतच. पु ल देशपांडे यांनी लिहिलेल्या एक होता विदूषक या जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटात मुख्य भूमिका निभावली ती लक्ष्याने. या चित्रपटात त्याने केलेल्या गंभीर भूमिकेने त्याच्या अभिनय क्षमतेवर शिक्कामोर्तब केले. हा चित्रपट तिकीट बारिवर अपयशी ठरला तरी त्यातील त्याच्या गंभीर भूमिकेने त्याला अनेक पुरस्कार मिळवून दिले. लक्ष्याने विनोदी भूमिका अधिक केल्या आणि त्या यशस्वीही झाल्या म्हणून विनोदी अभिनेता असे त्याचे वर्णन करणे हा त्याच्यावर अन्याय ठरेल. गंभीर भूमिकाही उत्तम प्रकारे करू शकतो हे लक्ष्याने एक होता विदूषक तसेच लेले विरुद्ध लेले आणि सर आले धावून या नाटकातून दाखवून दिले. आयुष्यभर प्रेक्षकांना हसवणारा हा कलाकार १६ डिसेंबर २००४ रोजी प्रेक्षकांना दुःखाच्या सागरात बुडवून काळाच्या पडद्याआड गेला. विनोदाचा अचूक टायमिंग साधणारा, अभिनयाची दैवी देणगी लाभलेल्या सर्वांच्या लाडक्या हरहुन्नरी लक्ष्याला स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

## नऊ वर्षांची चिमुकली तीन दिवसांपासून रहस्यमयरित्या बेपत्ता

**जळगाव -** चाळीसगाव तालुक्यातील तरवाडे बुद्रुक या गावात धक्कादायक घटना घडली आहे. एक नऊ वर्षांची चिमुकली रहस्यमयरित्या बेपत्ता झाल्याने खळबळ उडाली आहे. धनश्री शिंदे असं बेपत्ता झालेल्या मुलीचं नाव आहे. धनश्रीचे शाळेचे दप्तर गावाच्या वेशीबाहेर आढळून आलं. या घटनेला आता तीन दिवस उलटून गेली तरीही तिचा शोध लागला नाही. धनश्री ही तरवाडे बुद्रुक गावातील शाळेत शिकत होती. १२ डिसेंबरला शाळा सुटल्यानंतर ती घरी परतलीच नाही. त्यानंतर पोलिसांत तक्रार करण्यात आली असून तिचा तीन दिवसांपासून तिचा शोध लागला नाही. त्यामुळे धनश्रीचे कुटुंबीय चिंतेत आहेत. धनश्रीच्या वडिलांनी याबाबत एबीपी माझाशी संवाद साधला. ते म्हणाले की, धनश्री सकाळी १० वाजता शाळेत गेली. सायंकाळी पाच वाजता शाळा सुटली. त्यावेळी दोन मुलं घरी आली पण ती आली नाही म्हणून तिचा शोध घ्यायला शाळेकडे गेलो. तिकडे सापडली नाही म्हणून पूर्ण गाव शोधलं, पण ती कुठेही आढळून आली नाही. त्यानंतर दोघा-तिघांना सागून शोधाशोध सुरू केली. त्यानंतर पोलिसांना फोन केला. पोलिसांनीही शोध केला पण तिचा पत्ता लागत नाही. गेल्या तीन दिवसांपासून धनश्री बेपत्ता असल्याने पोलीस अधिकारी आणि कर्मचारी गावात ठाण मांडून आहेत. एलसीबी तसेच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी शाळेतील शिक्षकांची विचारपूस केली आहे. पोलीस प्रशासनाकडून चिमुकलीचा कसून घेण्यात येत आहे.

### दिल्ली शंखनाद महोत्सव : भारताचे सामरिक धोरण !

# विश्व सनातन संस्कृतीकडे वळत आहे ! - डॉ. सुधांशू त्रिवेदी

**नवी दिल्ली । प्रतिनिधी -** पूर्वी सनातन संस्कृतीची खिल्ली उडवणारे लोक आता आयुर्वेदाकडे वळत आहेत. रासायनिक शेतीऐवजी सेंद्रिय शेतीकडे वळत आहे. चहा-कॉपीऐवजी 'हर्बल टी'कडे वळत आहेत. एकेश्वरवादी लोक अनेक देवांवर विश्वास ठेवत आहेत. देशातील १७७ देशांनी भारताच्या 'योग दिना'च्या ठरावाला संयुक्त राष्ट्र संघात अनुमोदन आहे. मौजमजेत रममाण होणारे युरोपातील देश कुंभमेळ्यामध्ये येत आहेत. हा सनातन संस्कृतीचाच प्रभाव आहे. विश्व हळूहळू सनातन संस्कृतीकडे वळत आहे, हा पालट इतरांना बाधित न करता होत आहे, असे प्रतिपादन भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ता डॉ. सुधांशू त्रिवेदी यांनी केले. ते नवी दिल्लीतील 'सेव्ह कल्चर सेव्ह भारत फाउंडेशन' आणि 'सनातन संस्था' यांच्या वतीने आयोजित 'सनातन राष्ट्र शंखनाद म होत्सवा'त बोलत होते.

**'गझवा-ए-हिंद'ला वैचारिक उत्तर देण्यासाठी प्रारंभ करा! - कर्नल आर्.एस्.एन्. सिंह, 'रॉ'चे माजी अधिकारी**

या महोत्सवात 'रणसंवाद - भारताचे सामरिक धोरण' या परिसंवादात बोलतांना 'रॉ'चे माजी अधिकारी कर्नल आर.एस.एन. सिंह म्हणाले, आपल्या देशात अंतर्गतही एक पाकिस्तान आहे. प्रत्यक्ष पाकिस्तानात आपण 'ऑपरेशन सिंदूर' राबवू शकतो; पण देशांतर्गत पाकिस्तानचे काय करणार? या कट्टरतावादी विचारांपासून आपल्याला धोका आहे. भारतीय राजकारणाचा आपण विचार करताना दिसून येते की, येथील देशद्रोह्यांची साथ घेतली आणि अंतर्गत पाकिस्तान्यांची मदत घेतली की, सत्तेत रहाता येते. आपल्या देशातील अंतर्गत पाकिस्तानी ऑपरेशन सिंदूरम ुळे फार दुःखी होतात. त्यामुळेच या 'गझवा-ए-हिंद'ला वैचारिक उत्तर देण्यासाठी प्रारंभ करा.

विंग कमांडर विनायक डावरे म्हणाले, 'ऑपरेशन सिंदूर'च्या वेळी खरी कारवाई झाली. सेनेने अचूक लक्ष साध्य करत यापूर्वी शत्रूवर छोट्या स्वरूपात कारवाई झाल्या. ९३ हजार पाक सैनिकांनी १९७१ च्या युद्धाच्या वेळी शरणागती पत्करली; मात्र नॅरेटिव्हच्या लढाईत आपण हरलो. पूर्व पाकिस्तान (बांगलादेश)ला स्वातंत्र्य 'मुक्ती बाहिनी'मुळे मिळाले. च या नॅरेटिव्हला त्यावेळी भारताने याला विरोध केला नाही.

ब्रिगेडियर (निवृत्त) संजय अग्रवाल म्हणाले, भारत-चीन १९६२ च्या युद्धाविषयी अनेकदा चर्चा होते, मात्र १९६७ च्या युद्धात भारताने चीनला पराभूत केले होते, हे सुद्धा लक्षात घेतले पाहिजे. भारताने आपली शक्ती जाणावी, यासाठी अशा महोत्सवांची आवश्यकता आहे. देशाने आपले लक्ष्य निर्धारीत करावे.

'यूथ फॉर पनून काश्मीर'चे अध्यक्ष श्री. राहुल कौल कश्मिरी हिंदूंच्या संघर्षाविषयी सांगताना म्हणाले, कश्मिरी हिंदूंचा वंशविच्छेद झाला हे अजूनही सरकार मानायला तयार नाहीत. पर्यटनाने दहशतवाद थांबेल या भ्रमात कोणी राहू नये. जगती




जम्मू येथे १६ जानेवारी २०२६ पासून विशेष अभियान सुरु करत आहोत. जम्मू काश्मीरमधील हिंदूंना देशातील सर्व हिंदूंच्या सहकार्याची आवश्यकता आहे. दूरदर्शन (डीडी) न्यूजचे संपादक श्री. अशोक श्रीवास्तव म्हणाले, 'काही राजकीय नेते हिंदुत्वाला डेंग्यू, म लेरिया, एड्स म्हणतात, तेव्हा प्रसारम ाध्यमे शांत बसतात. सध्या इस्लाम ोफोबियाची चर्चा आहे. प्रत्यक्षात हिंदूफोबिया प्रचंड प्रमाणात आहेत. हिंदूफोबियाविषयी एक अहवाल आहे. भारतात डिसेंबर २०२५ च्या पहिल्या ११ दिवसांत हिंदूंना केवळ ते हिंदू आहेत, म्हणून त्रास देण्याच्या १०४ घटना घडल्या आहेत.

# हल्लेखोर प्राण्यांचासरकारला सुचक सल्ला,आतातरी जंगल वाचवा अन्यथा गंभीर परिणाम भोगण्यास तयार रहा!

बिबट्या शहरात का येतो,याचा अभ्यास सरकारने कधी केला का?सरकारला आताच शेळ्या का आठवल्या? असे अनेक प्रश्न सध्याच्या परिस्थितीत उपस्थित होत आहे. सध्या राज्यभरात बिबट्याने मोठ्या प्रमाणात धुमाकूळ घातला आहे.नुकताच नागपूरात दिनांक १० तारखेला बिबट्याने ७ जणांना गंभीररित्या जखमी केले. त्यामुळे बिबट्याचे हल्ले रोखण्यासाठी जंगलात १ कोटी शेळ्या सोडण्याची घोषणा वनमंत्री गणेश नाईक यांनी केली.परंतु प्रश्न निर्माण होतो की एक कोटी शेळ्या येणार कोठुन आणि आपण कुत्रेच पकडु शकत नाहीत तर एक कोटी शेळ्या सोडल्याने सरकारला बिबटे सापडतील असे मला वाटत नाही आणि सापडले तर ठेवणार कोठे. कारण विधिमंडळ परिसरात रेड कार्पेटवर भटके कुत्रे बिनधास्त फिरत होते हे कुत्रे पकडण्यास मनपा कर्मचाऱ्यांनी भरपूर मेहनत घेतली पण कुत्रे पकडण्यात अपयश आले.त्यामुळे आपण कुत्रे पकडू शकत नाही तर बिबटे कसे काय पकडणार हाही मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. आपण जंगल संपदा वाढविली असती आणि जंगल कटाई रोखली असती तर आपल्याला गावात किंवा शहरात बिबट्या किंवा हिंसक पशु दिसलेच नसते हेही तितकेच सत्य आहे.त्यामुळे बिबट्यासाठी शेळ्यांचा बळी आणि जंगलतोडीम ुळे बिबट्याकडुन शेतकरी, शेतमजूर, गावातील नागरिक, शहरातील नागरिक, पाळीव प्राणी यांचा बळी हे कितपत योग्य म्हणावे! त्याकरिता सरकारने जंगल वाचविले तर सर्वांचाच जीव आपोआप वाचले व सुरक्षित राहील. पर्यावरण प्रेमी, सामाजिक संघटना, गावकरी,राज्यातील नागरिकांना आणि स्वतः निसर्ग जंगल तोडीचा कडाडून विरोध करीत आहेत.तरीही विकासाच्या नावावर किंवा धार्मिकतेच्या नावांवर मोठ्या प्रम ाणात जंगलतोड व वृक्षांची कत्तल सुरूच आहे आणि हे संपूर्ण दृश्य सरकार, लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. तरीही जंगल कटाई अजुन पर्यंत थांबलेली नाही.बिबट्या शहरात किंवा गावात धाव का घेत आहेत याची कल्पना सरकार आहे तरी शहरीकरण,औद्योगिकरण, धार्मिकतेच्या नावांवर मोठ्या प्रमाणात जंगलतोड वाढत आहे.आज राज्यातीलच नाही तर देशातील प्रत्येक शहरांचा विचार केला तर प्रत्येक शहराच्या मुख्य पॉईंट्स पासुन ४० किलोमीटर अंतरापर्यंत शहरीकरण व औद्योगिकरण झालेले आहे.आपण आपल्या सुखसुविधांसाठी जंगल तोडून शहरीकरण केले हे ठीक आहे.परंतु बिबट्या किंवा इतर प्राण्यांचा विचार सरकारने कधी केला का?की त्यांचे काय होईल?या मुक्या पशुपक्ष्यांना कोण अन्नपाणी देयील याचा विचार राज्यातील कोणत्याही सरकारने केलाच नाही.त्याचेच प्रायश्चित्त म्हणजे आज बिबट्यानी राज्यातील प्रत्येक शहरांमध्ये व गावांमध्ये धुमाकूळ घालत आहे. आज बिबट्या आपल्या अन्नासाठी शहरात येतो आणि सरकारला खडबडून जाग येतो, आणि सरकार म्हणते की बिबट्यांचा शहरातील हैदोस पहाता त्यांच्या खाद्यपुर्तीसाठी एक कोटी शेळ्या जंगलात सोडू.अहो तुम्ही वरच्यावर जंगल कापत रहाल तर शेळ्या कुठे सोडणार?आपण जर शेळ्या जंगलात सोडत असाल तर ही तर पाळीव प्राण्यांची हत्याच म्हणावी लागेल. आता शहरीकरण थांबायला तयार नाही, त्यामुळे सरकारने बिबट्यांना पाळीव प्राण्यांचा दर्जा दिला तर बरे होईल.कारण शेळ्या जंगलात सोडण्यापेक्षा आम्ही घरीच त्यांना जेवण देवू शकतो.सरकारने सर्वच गोष्टींचा गांभीर्याने विचार करने गरजेचे आहे.कारण देशासह राज्यात लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे, बिबट्यांची संख्या वाढत आहे,कुत्र्यांची संख्या वाढत आहे यावर ठोस पाऊल उचलने गरजेचे आहे.सरकारने जर जंगल वाचविले तर बिबट्या किंवा अन्य हिंसक पशु यांना शेळ्यांची सुध्दा गरज भासणार नाही.सरकार चुकीचा अंदाज लावत आहे की बिबट्या शहरात किंवा गावात येतो.परंतु तसे अजीबात नाही कारण बिबट्या किंवा अन्य पशुपक्षी यांच्या घरांवर आपणच म्हणजे मानवजाती व मुख्यत्वे करून सरकारने अतिक्रमण केले आहे म्हणून बिबट्या सारखे अनेक हिंसक पशु शहराकडे किंवा गावाकडे धाव घेतांना दिसतात व यामुळे जीवीत हाणीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.यात बिबट्याचा काय दोष! बिबट्या हा आपली खाद्यपुर्तीसाठी शहरात येत आहे,म्हणून काय त्यांच्या खांद्यपुर्तीसाठी आपण शेळ्यांचा वापर करणार काय? म्हणजे एकाचा जीव वाचवण्यासाठी दुसऱ्याचा जीव घ्यायचा हा कुठला न्याय?ही हत्याच म्हणावी लागेल!त्यापेक्षा सरकारने जंगल कटाई व वृक्षतोड थांबविली तर बिबट्यांचेही प्राण वाचतील व शेळ्यांचा सुध्दा जीव वाचेल. सरकार साधुग्रामसाठी तपोवनातील १८०० झाडांची हत्या करण्याच्या तयारीत आहे.याचा पुढे नाशिककरांसाठी काय विपरीत परिणाम होईल हे आज राज्यातील अनेक भागात बिबट्या दाखवित आहे.त्यामुळे बिबट्यांची वाढती संख्या, जंगल कटाई आणि बिबट्यांच्या खाद्यपुर्तीसाठी शेळ्यांची पेशकस हे कितपत योग्य आहे याचा सरकारने गांभीर्याने विचार केला पाहिजे व संपूर्ण हिंसक पशुंचे वास्तव जंगलात कसे राहील याचा अभ्यास पुर्वक विचार सरकारने केला पाहिजे. कारण गेल्या काही वर्षांपासून बिबट्या शहरात व गावात येत आहे.याचेच प्रायश्चित्त म्हणून जंगलतोडीमुळे शेतकरी, गुराखी,पाळीव प्राणी यांची आतापर्यंत मोठ्या प्रमाणात जीवित हानी झाली आहे.सरकारने विचार करायला हवा की, मोजक्या बिबट्यासाठी एक कोटी शेळ्यांचा हत्या करायची हे कितपत योग्य म्हणावे. आपण वनसंरक्षक कायद्यानुसार जंगली पशुंना मारू शकत नाही.परंतु बिबट्यांचा शहरात व गावातील वाढता हैदोस पहाता सर्वसामान्यांच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारने व वनविभागाने स्वीकारली पाहिजे. त्यामुळे यावर सरकारजवळ एकच उपाय आहे तो म्हणजे जंगल वाचविणे. बिबट्यांना शेळ्या खाऊ घाला किंवा आणखी काही खाऊ घाला जोपर्यंत जंगलतोड थांबणार नाही तोपर्यंत हिंसक पशुंचे आक्रमक सुरूच राहील सावधान!

भिवापूर तालुक्यात वाघांचा मुक्त संचार सुरू असल्याचे गावकरी, शेतमजूर, गुराखी, सामान्य नागरिक सांगत आहेत.याकडे वनविभाग दुर्लक्ष करीत आहे असा भिवापूर वासीयांचा आरोप सुध्दा केला आहे.या गंभीर समस्येकडे भिवापूर तालुक्यातील खरेदी-विक्री संघाने वनमंत्री गणेश नाईक यांना निवेदन सुध्दा दिले आहे.यावरून स्पष्ट होते की हिंसक पशुंचा मुक्त संचार राज्यातील अनेक भागात,जिल्ह्यांत,गाव खेड्यात, शहरात सुरूच आहे.परंतु यावर वनविभागाने अजुन पर्यंत ठोस उपाययोजना केल्याचे दिसत नाही.हल्लेखोर प्राणी आता सरकारला सल्ला देत आहे की, आताही जंगल वाचवा.त्यामुळे वनविभाग व सरकारला आग्रहाची विनंती आहे की, आपल्याला हिंसक पशु पासुन जर सुरक्षित रहायचे असेल तर प्रथम जंगल संपदा वाढविली पाहिजे.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार, म ो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# स्वसंरक्षण शिबीर काळाची गरज - वर्षा पित्ती

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील शांतीनिकेतन विद्या मंदिर या शाळेत जालना जिल्हा पोलीस दलाच्या वतीने मुलींना दोन दिवशीय शिबीर आयोजित करुन मुलांना स्वसंरक्षणाचे धडे देण्यात आले. यावेळी सायबर क्राईम ब्रॅचचे प्रमुख संजय सोनवने यांनी विद्यार्थिंनीना सविस्तर मार्गदर्शन केले.

सदरील प्रशिक्षण जालना येथील कराटेपटू दत्ता पवार, ज्योती पवार, विशाल चौंडी यांनी दिले. यावेळी प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थिंनीना अनेक प्रकारे प्रात्यक्षिक सादर करुन प्रत्यक्षात मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी शहरातील रॉटरी क्लबच्या वर्षा पित्ती यांनीही आवर्जुन उपस्थित राहून विद्यार्थिनीना मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष भास्करराव अंबेकर,संचालक अश्विन अंबेकर यांच्यासह माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका प्रेमला पंडीत, प्राथमि कच्या मुख्याध्यापक ज्ञानेश्वर गाढवे यांची उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना संजय सोनवने म्हणाले की, पोलीस दल सातत्याने आपल्या सेवेसाठी तत्पर आहे. आपण आपल्यावर होणार्या अन्याय व अत्याचाराची माहिती तात्काळ पोलीसांना कळवावी. तक्रारदार महिला अथवा मुलीचे नाव गोपनीय ठेवण्यात येत असल्याने कोणतीही काळजी अथवा भिती बाळगण्याची गरज नाही.

यावेळी मार्गदर्शन करतांना वर्षा पित्ती म्हणाल्या की, काळ बदलत आहे. त्याप्रमाणे महिलांनीही स्वसंरक्षण करता यावे या करिता अशा प्रकारे प्रशिक्षण घेवून आपला प्राण वाचवता येईल. मुलींनी कोणत्याही प्रसंगी घाबरुन जाऊ नये तर वेगवेगळ्या प्रशिक्षणात सांगितल्या प्रमाणे विविध मार्गाचा अवंलब करुन प्रतिकार करावा, पोलीस दल व समाजसेवी संघटना सदैव आपल्या पाठीशी ठामपणे उभी आहेत. यावेळी सर्व प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनीना संस्थेचे अध्यक्ष भास्करराव अंबेकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करुन त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी यावेळी शिक्षिका किर्ती खैरे, चौधरी, कांचन वाघ, अरुणा मांन्टे, सुमित्रा शर्मा,अंबादास घायाळ, प्रा. विकास राठोड, पांडूरंग वांजे, शिवहरी मांन्टे यांयासह मोठ्या संख्येने विद्यार्थिंनी, शिक्षकांची उपस्थिती होती.

स्त्री सरस्वतीबरोबरच दुर्गेचेही रुप धारण करु शकते- अश्विन अंबेकर यावेळी मार्गदर्शन करतांना संस्थेचे संचालक अश्विन अंबेकर म्हणाले की, स्त्री ही आजच्या काळात पुरुषांच्या बरोबर सर्वच क्षेत्रात काम करीत



आहे. स्त्री सरस्वतीबरोबरच दुर्गेचेही रुप धारण करु शकते, याची जाणिव सर्वांनी ठेवणे आवश्यक आहे. अशा प्रशिक्षणाच्या माध्यमातून समाजात महिला, मुली अत्यंत आत्मविश्वसाने वावरु लागतील यात कुठलीही शंका वाटत नाही.

### सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात 'सुरक्षा, संस्कृति आणि शौर्य' यांचा जागर

# सनातन प्रवाहाच्या आड येणाऱ्यांना सहनही करणार नाही ! - गजेंद्रसिंह शेखावत





**सनातन प्रवाहाच्या आड येणाऱ्यांना सहनही करणार नाही - गजेंद्रसिंह शेखावत**

**नवी दिल्ली -** दिल्ली येथील सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव हा केवळ उत्सव नव्हे, तर भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागृतीचा उदघोष करणार हा एक उत्सव आहे. अयोध्येत प्रभुश्रीरामाची पुनर्स्थापनेनंतर कालचक्र पालटल्याचे आणि भारतीय संस्कृतीचा पुनःश्च उदय होऊ लागल्याचे दिसू लागले आहे. देश आज सांस्कृतिक पालटाची स्थिती अनुभवत आहे. सनातन धर्म हा कुणाच्याही विरोधात नाही; मात्र सनातन प्रवाहाच्या आड योणार्यांना सहन केले जाणार नाही, असे ठाम प्रतिपादन केंद्रीय पर्यटन आणि सांस्कृतिक मंत्री श्री. गजेंद्रसिंह शेखावत यांनी केले. ते नवी दिल्ली येथील भारत मंडपम् येथील 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'त बोलत होते. मा. शेखावतजी पुढे म्हणाले की, सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांनी गेली २५ वर्षे संस्थेच्या कार्यातून केवळ साधकांची आध्यात्मिक उन्नती केलेली नाही, तर समाजाला नैतिकता, राष्ट्रबोध, तसेच सर्वांत महत्त्वाचे म्हणजे समाजात धर्मचेतना निर्माण केली आहे.

**काशी-मथुराच नव्हे, तर देशातील प्रत्येक मंदिर मुक्त होईपर्यंत लढ्याचा निर्धार करा !- अधिवक्ता विष्णु जैन**

अनेक राज्यांमध्ये सरकार केवळ हिंदूंची मंदिरेच का ताब्यात घेते ? सरकारला मशिदी, चर्चेस यांतील गैरव्यवस्थापन दिसत नाही का ? शासन मंदिर मुक्तीचा कायदा कधी आणणार?, तसेच आपण सर्वच हिंदूविरोधी कायदे संपवण्याची मागणी लावून धरली पाहिजे ! केवळ काशी विश्वनाथ आणि श्रीकृष्ण जन्मभूमीच नाही, तर देशातील अतिक्रमण केलेले प्रत्येक हिंदू मंदिर मुक्त होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही, असा निर्धार आपण केला पाहिजे, असे आवाहन सर्वोच्च न्यायालयातील अधिवक्ता विष्णु शंकर जैन यांनी केले.

**शंखनाद महोत्सवामुळे धर्म-अधर्माच्या युद्धात धर्माचाच विजय निश्चित ! - आलोक कुमार, विहिंप**

शंखनाद हा धर्म-अधर्म युद्धाच्या वेळी केला जातो. भारताच्या राजधानीत होत असलेल्या 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'मुळे धर्म-अधर्माच्या युद्धात धर्माचाच विजय निश्चित होईल, याची खात्री वाटते. दिल्ली येथे हल्लीच आतंकवादी आक्रमण झाले. हे आतंकवादी उच्चशिक्षित होते आणि यामुळे जिहाद हा गरीबी, अशिक्षितपणा, मुलभूत गरजा नसणे आदींमुळे वैफल्यग्रस्त होऊन केला जातो, हा भ्रम नष्ट झाला आहे. अल्पसंख्याकांना दिलेल्या विशेषाधाकारांचा पुनर्विचार झाला पाहिजे, असे विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय कार्याध्यक्ष आलोक कुमार म्हणाले.

**'जनसंख्या जिहाद' रोखणे अत्यावश्यक ! - डॉ. सुरेश चव्हाणके, सुदर्शन न्यूज नेटवर्क**

हिंदू शस्त्राच्या लढाईत सक्षम आहे; मात्र तो वैचारिक लढ्यामध्ये कमी पडतो. हिंदूंना 'हम दो, हमारे दो' असा शिकवण दिली गेली आणि आज हिंदूंचा देहली येथे जन्मदार १.१, मुंबई येथील जन्मदर १.३ अशी दयनीय स्थिती झाली आहे. अनेक देश हे जन्मदर वाढवल्याने इस्लामी देश झाले, तर काही देश घुसखोरीमुळे इस्लामी झाले आहेत. घुसखोरांना देशातून हाकलून लावण्यासाठी देशात 'एन.आर्.सी.' लागू केली पाहिजे, असे प्रतिपादन सुदर्शन न्यूजचे संपादक डॉ. सुरेश चव्हाणके यांनी केले.

### जालना माहेश्वरी बॉक्स क्रिकेट लीगचे आयोजन

# ४० वर्षांवरील खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ; ३० वर्षावरील महिलांचाही सहभाग- ॲड. अर्चना तोतला

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील माहेश्वरी समाजाच्या क्रीडाप्रेमाला नवी उंची देणारी जालना माहेश्वरी बॉक्स क्रिकेट डे-नाईट लीग-सिझन २ येत्या १ ते ४ जानेवारीदरम्यान जुनी औद्योगिक वसाहत येथील केनिया क्रिकेट टर्फवर आयोजित करण्यात आली आहे. स्व. धोंडाबाई तोतला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्यावतीने सलग दुसऱ्या वर्षी या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असून, ही लीग केवळ क्रिकेट स्पर्धा न राहता माहेश्वरी समाजातील एकजूट, खेळभावना आणि सन्मान यांचा उत्सव ठरणार आहे, अशी माहिती संस्थेच्या अध्यक्षा ड. सौ. अर्चना तोतला आणि सचिव सीए ड. नितीन तोतला यांनी दिली.



ही स्पर्धा जालना शहरातील फक्त माहेश्वरी समाजासाठी असून ४० वर्षांवरील खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ देण्याचा उद्देश या लीगमागे आहे. एकूण १० संघ या स्पर्धेत सहभागी होत असून, शंभरहून अधिक खेळाडू मैदानात उतरतील. विशेष बाब म्हणजे ३० वर्षांवरील महिलांनाही या स्पर्धेत खेळण्याची संधी देण्यात आली असून, त्यामुळे महिलांचा सक्रिय सहभाग ही या लीगची ओळख ठरणार आहे.


स्पर्धा डे-नाईट स्वरूपात खेळविण्यात येणार असून दररोज सकाळी ६ ते १० आणि सायंकाळी ६ ते १० या वेळेत सामने रंगतील. विजेत्या व उपविजेत्या संघांना आकर्षक ट्रॉफी आणि रोख बक्षिसे देण्यात येणार असून, सहभाग घेतलेल्या प्रत्येक संघालाही ट्रॉफी प्रदान करण्यात येणार आहे. खेळाडूंसाठी गुगल फॉर्मद्वारे नाव नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून २३ डिसेंबर रोजी खेळाडूंचा लिलाव होणार आहे.

**समाजातील प्रत्येक घटकाला मैदानात उतरवण्याचा संकल्प - ॲड. सौ. तोतला**

जालना माहेश्वरी बॉक्स क्रिकेट लीग ही केवळ स्पर्धा नाही, तर ४० वर्ष आणि त्यापेक्षा अधिक वयोगटातील खेळाडूंना त्यांच्या हक्काचे व्यासपीठ देण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे. खेळभावना आणि समाजातील एकोपा जपण्यासाठी अशा उपक्रमांची गरज आहे. महिलांचा सहभाग हे विशेष आकर्षण असून, समाजातील प्रत्येक घटकाला मैदानात उतरवण्याचा आमचा संकल्प आहे. समाजबांधवांच्या उपस्थितीने ही लीग अधिक संस्मरणीय होईल, असा विश्वास स्व. धोंडाबाई तोतला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा ड. सौ. अर्चना तोतला यांनी व्यक्त केला. क्रीडा आणि सामाजिक स्नेह यांचा संगम असलेल्या या उपक्रमाला समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



# विधानभवनात आवाज, जालन्यात सन्मान



आरक्षणासाठी ठाम भूमिका घेतल्याबद्दल धनगर समाजाकडून आमदार अर्जुन खोतकर यांचा जाहीर सत्कार करण्यात आला बंजारा व धनगर समाजाच्या ST आरक्षणाच्या न्याय्य मागणीसाठी हिवाळी अधिवेशन २०२५ दरम्यान नागपूर येथील विधानभवनात ठाम पणे आवाज उठवणारे आमदार अर्जुन खोतकर अधिवेशन संपवून जालना येथे परतल्यानंतर, धनगर समाजाच्या विविध पदाधिकारी व समाजबांधवांनी त्यांचा जाहीर सत्कार केला.

हा सत्कार दिनांक : १५ डिसेंबर २०२५ स्थळ : दर्शना बंगला, भाग्यनगर, जालना येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी आमदार अर्जुन खोतकर यांना शाल श्रीफल पारंपरिक काठी-घोंगडे पुष्पहार अर्पण करून समाजाच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. विधानभवनातील मांडली भूमिका हिवाळी अधिवेशन २०२५ मध्ये हैद्राबाद गॅजेटनुसार बंजारा व धनगर समाजाला ड्ढ आरक्षण मिळावे या मागणीसाठी आमदार खोतकर यांनी प्रश्नोत्तराच्या तासात सभागृहात स्पष्ट व आक्रमक भूमिका मांडत सरकारकडे थेट उत्तर मागितले होते. या भूमिकेमुळे धनगर समाजामध्ये विश्वास आणि समाधानाची भावना निर्माण झाली असल्याचे यावेळी समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

समाजाची भावना आमदार अर्जुन खोतकर यांनी आमचा प्रश्न विधानभवनात ठामपणे मांडला

हा लढा समाजाच्या न्यायाचा असून, असा आवाज आमच्यासाठी महत्त्वाचा आहे, अशी भावना सत्कारावेळी व्यक्त करण्यात आली.

आमदार अर्जुन खोतकर यांची भूमिका सत्कार स्वीकारताना आमदार अर्जुन खोतकर म्हणाले की, धनगर समाजाच्या न्याय्य हक्कासाठी मी विधानभवनात आवाज उठवला आहे आणि जोपर्यंत समाजाला दिसेल असा ठोस निर्णय होत नाही, तोपर्यंत हा लढा सुरूच राहील.

विधानभवनातील ठाम भूमिका आणि रस्त्यावर समाजाचा विश्वास -

आमदार अर्जुन खोतकर हे समाजाच्या प्रश्नांवर लढणारे प्रतिनिधी असल्याचे

या जाहीर सत्कारातून पुन्हा एकदा स्पष्ट झाले. यावेळी सर्वश्री श्रीमंत खटके, बळीराम खटके डॉ ,प्रकाश इंगळे ,अक्षय आटोळे ,उद्धव काळे ,अशोक राऊत ,शांतीलाल बनसोडे ,सौरस भिसे ,अभिजात खटके, शुभम ठाकूर ,सोमनाथ लोने ,रामनाथ अहिंदे ,निवृत्ती वीर, अप्पासाहेब खरजुले ,राम शिरगिरे ,आकाश नाईक ,बाळू बनसोडे, ठरवते सर ,तुकाराम खरजुले, राम खरजुले ,गंगाधर खोतकर ,माऊली भुसारे ,जनार्धन खोतकर ,बाळू काळे ,रवी खोमणे ,कैलास आटोळे ,राम आटोळे यांचेसह अनेक समजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाजपचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष नितिन नबीन

**नवी दिल्ली -** भाजपच्या संघटनात्मक पातळीवर महत्त्वाचा बदल घडवत नितीन नबीन यांची पक्षाच्या संसदीय बोर्डाकडून राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आली. संघटनात्मक अनुभव, सातत्यपूर्ण राजकीय कारकीर्द आणि पक्षनिष्ठा या निकषांवर ही निवड झाल्याचे स्पष्ट होते. दरम्यान, बिहारमध्ये नितीन नबीन यांची राजकीय कारकिर्द राहिली असली, तरी राष्ट्रीय पातळीवर त्यांच्या नावाची चर्चा कधीच झाली नाही. जेव्हा जेव्हा भाजप अध्यक्षांची नावे चर्चेत आली तेव्हाही त्यांच्या नावाचा समावेश नव्हता. त्यामुळे आता कोणालाही माहीत नसताना नितीन नबीन यांना संधी कशी मिळाली? जे कालपर्यंत बाजूला होते त्यांच्याच स्वागताला उभं राहण्याची वेळ अनेकांवर आली. त्यामुळे नितीन नबीन आहेत तरी कोण? त्यांची पार्श्वभूमी आहे तरी काय हे जाणून घेणार आहोत. नितीन नबीन यांची राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदी निवड ही भाजपच्या संघटनात्मक धोरणातील तरुण, अनुभवी आणि विश्वासार्ह नेतृत्वाला दिलेली संधी म्हणून पाहिली जात आहे. सध्या बिहार सरकारमध्ये मंत्री असलेले नितीन नबीन यांच्याकडे पथ निर्माण विभाग तसेच नगर विकास आणि आवास विभाग ही महत्त्वाची खाती आहेत. बांकीपूर विधानसभा मतदारसंघाचे ते आमदार असून, २०१० पासून सलग निवडणुकीत तेथून जनतेचा विश्वास मिळवत आले आहेत. याआधी त्यांनी भाजपचे छत्तीसगड प्रभारी म्हणूनही जबाबदारी सांभाळली आहे. राजकीय प्रवासाकडे पाहता, २००६ मध्ये त्यांनी सक्रिय राजकारणात प्रवेश केला. पटना पश्चिम मतदारसंघातून पहिल्यांदा आमदार झाल्यानंतर त्यांनी बांकीपूर मतदारसंघात आपली पकड मजबूत केली. २०२१ मध्ये नितीश कुमार यांच्या सरकारमध्ये त्यांना प्रथमच मंत्रीपद देण्यात आले. याशिवाय २०१६ ते २०१९ या काळात त्यांनी भाजप युवा मोर्चाचे बिहार प्रदेशाध्यक्ष म्हणून संघटनात्मक कामाचा ठसा उमटवला. मे १९८० मध्ये रांची येथे जन्मलेले नितीन नबीन शिक्षणानुसार मॅट्रिक आणि इंटरपर्यंत शिक्षित असून, निवडणूक प्रतिज्ञापत्रात त्यांनी स्वतःला सामाजिक कार्यकर्ता म्हणून नमूद केले आहे.

## ध्येयाने प्रेरीत होऊन उद्योग उभारावेत - के डी दांडगे

**जालना । प्रतिनिधी -** मिटकॉन प्रशिक्षण केंद्र जालना यांच्या वतीने जालना येथे आज दि.२८ नोव्हेंबर २०२५ रोजी एकदिवसीय उद्योजकीय चर्चासत्र घेण्यात आले.या वेळी के डी दांडगे जिल्हा प्रकल्प अधिकारी मिटकॉन जालना व सचिन सुपारकर यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी वंदना काकडे, शिलाताई तिवरे, गौतम लहाने, शिवाजी पाटील , विकास बोर्डे गोकुळ लाड,सुरेश गंगातिवरे, सचिन बोर्डे ,सोनु मोरे, सुनील गंगातिवरे, अशोक लाड व वैभव उचाटे ईतरांची उपस्थिती होती .या चर्चासत्रात मार्गदर्शन करताना दांडगे म्हणाले की तरुणांनी सकारात्मक विचार करुन व ध्येयाने प्रेरित होऊन उद्योग उभारले पाहिजेत. या चर्चासत्रात उद्योगसंधी मार्गदर्शन, उद्योग व्यवसाय वाढीसाठी गुणवत्ता, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा, व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योग मंडळाच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, कृषी संलग्न योजना, प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था,भांडवल उभारणी



,मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने, लागणारी कागदपत्रे इत्यादी बाबत मार्गदर्शन केले. अधिक माहिती व मार्गदर्शनासाठी के डी दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी, मिटकॉन द्वारा पत्रकार भवन ,एस पी ऑफिस समोर , शासकीय ग्रंथालयाच्या बाजुला, जालना मो.नंबर ९४२३७३०९३२ येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# अधिकृत नळ कनेक्शन असतांना ७५०० रुपयांची जबर वसुली

## मनपाच्या एजन्सीवर गंभीर आरोप

**जालना । प्रतिनिधी -** नामांतर प्रक्रियेच्या नावाखाली नागरिकांना आर्थिक त्रास, अनधिकृत नळ कनेक्शनची सरसकट कारवाई करून मनमानी वसुली केल्याचा दावा साद बीन मुबारक यांनी केला.

आज दिनांक १५ सोमवार रोजी दुपारी चार वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना शहर महानगरपालिकेअंतर्गत अधिकृत नळ कनेक्शन असतानाही नागरिकांकडून अनधिकृत नळ कनेक्शनच्या नावाखाली जबर वसुली केली जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. दुखी नगर परिसरातील नागरिकांकडून तब्बल ७५०० रुपये भरून घेण्यात आल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ता साद बीन मुबारक यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केला आहे.

काझीपुरा, टांगा स्टँड भागातील नसीब शेख नसीर यांनी सन २०२३ मध्ये भुमापन क्रमांक ३२५१, क्षेत्र १७.४० चौ.मी. ही जागा खरेदीखत क्रमांक ३७३६/२०२३ अन्वये विकत घेतली आहे. सदर मालमत्ता त्यांच्या बहिणीच्या नावे असून नामांतर प्रक्रिया प्रलंबित आहे. नामांतरासाठी चौकशी केली असता टॅक्स भरल्याशिवाय नामांतर होणार नसल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, त्यांच्या घराला आधीपासून अधिकृत नळ कनेक्शन असतानाही मनपाच्या वतीने नियुक्त करण्यात आलेल्या एजन्सीने सदर नळ कनेक्शन अनधिकृत असल्याचा दावा करत तब्बल ७५०० रुपये भरण्यास भाग पाडले. विशेष म्हणजे, घराच्या पूर्वीच्या मालकाच्या नावाची नोटीस अस्तित्वात असतानाही कोणतीही शहानिशा न करता ही वसुली करण्यात आली.

धक्कादायक बाब म्हणजे, ७५०० रुपये भरल्यानंतरही संबंधित कर्मचाऱ्यांनी एकूण २४,०११ रुपये संपूर्ण टॅक्स म्हणून भरावे लागणार असल्याचे नागरिकांना सांगितले आहे. म्हणजेच, अधिकृत नळ कनेक्शन असूनही अनधिकृत कारवाई करत नागरिकांना आर्थिक त्रास दिला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सदर रक्कम फोनपे द्वारे भरली असून त्याची पावती देखील अर्जासोबत जोडण्यात आली आहे. मनपाच्या वतीने ज्या खासगी एजन्सीला वसुलीचे काम देण्यात आले आहे, ती एजन्सी कोणतीही तपासणी न करता सरसकट अनधिकृत नळ कनेक्शनच्या नोटीसा बजावत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

यामुळे शहरातील अनेक नागरिक संभ्रमात असून, अधिकृत कनेक्शन असूनही मनपा कार्यालयात वारंवार चकरा माराव्या लागत असल्याचे चित्र आहे. नामांतर प्रक्रियेसाठी प्रयत्न करणाऱ्या नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी, संबंधित एजन्सीकडून वसुलीचे काम तात्काळ काढून घेण्यात यावे, तसेच अधिकृत नळ कनेक्शन असलेल्या नागरिकांवर अन्यायकारक कारवाई थांबवावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता साद बीन मुबारक यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.